राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र. ०२/का.७
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ डिसेंबर,२०२१

प्रति,
जिल्हाधिकारी,
भंडारा व गोंदिया

विषय: भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांच्या आरक्षणाबाबत...

संदर्भ: १) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका ८४१/२०२१, विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व रिट याचिका क्र.१३१६/२०२१ मधील दि. १५/१२/२०२१ रोजीचा निर्णय.

२) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे पत्र दि.२६/११/२०२१ रोजी अन्वये दिलेला निवडणूक कार्यक्रम

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. III दि.२३/०९/२०२१ अन्वये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी २७ टक्क्यांपर्यंत आरक्षण देण्याची तसेच एकूण आरक्षण हे त्या स्थानिक स्वराज्य संस्थांतील एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद करण्यात आली आणि त्यास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाने दि. २६/११/२०२१ रोजी भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व १५ पंचायत समित्यांचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम निर्गमित केला; ज्यामध्ये सदर अध्यादेशातील तरतूदीनुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी जागा आरक्षित करण्यात आल्या होत्या;

आणि ज्याअर्थी, विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व रिट याचिका क्र.१३१६/२०२१ अन्वये सदर अध्यादेशास मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०६/१२/२०२१ रोजीच्या आदेशानुसार सद्यस्थितीत सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रीयेतील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित करण्यात आलेल्या जागांच्या निवडणूकींना स्थगिती दिली. त्यानुसार दि. ०७/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये आयोगाने भंडारा व गोंदिया २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित केलेल्या जागांच्या निवडणूका तात्काळ स्थगित केल्या. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उपरोक्त निवडणूकांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व खुल्या जागांसाठी होणाऱ्या निवडणूका पुढे सुरू ठेवण्यात आल्या;

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने संदर्भाधीन रिट याचिकेमध्ये दि. १५/१२/२०२१ रोजीच्या सुनावणी नंतर पारीत केलेल्या आदेशामध्ये राज्य निवडणूक आयोगाला असे स्पष्ट निदेश दिले आहेत की, सुरू असलेल्या निवडणुक प्रक्रीयेमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित करण्यात आलेल्या ज्या जागांची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे, त्या जागा तात्काळ अनारक्षित करुन सर्वसाधारण प्रवर्गातून भरण्यात याव्यात;

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर निकालामध्ये असेही स्पष्ट केले आहे की, राज्य निवडणूक आयोग या अनारक्षित झालेल्या नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या जागांच्या निवडणुकांचा कार्यक्रम एका आठवडयात जाहीर करेल आणि या अनारक्षित जागांचा निकाल हा सद्या सुरू असलेल्या अन्य जागांसाठीच्या निवडणूकांच्या निकालासोबत एकत्रित जाहीर करेल;

त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने संदर्भाधीन क्र. १ अन्वये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने संदर्भाधीन क्र. २ अन्वये जाहीर केलेल्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

१. राज्य निवडणूक आयोगाने वरील परिच्छेद १ मधील नमूद सर्व सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमाकरीता अधिसूचित करण्यात आलेल्या नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या सर्व आरक्षित जागा या तात्काळ अनारक्षित करण्यात आल्याचे याद्वारे जाहीर करण्यात येत आहे.

२. वर नमूद केल्यानुसार मुलत: नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित असलेल्या ज्या जागा सर्वसाधारण प्रवर्गाच्या होतील, त्या जागांपैकी सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित ठेवावयाच्या जागा हया महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम,१९९६ मधील तरतुदीनुसार व आयोगाचे दि.०४/१०/२०११ तसेच दि.१२/०३/२०२० रोजीच्या आदेशानुसार आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या तत्वानुसार कोणत्या निवडणूक विभाग व निर्वाचक गणात देय होतील हे निश्चित करण्यात यावे.

३. आवश्यकतेनुसार सदर जागांचे महिलांकरिता आरक्षण निश्चित करण्याकरिता सोडत प्रक्रिया राबविण्यात यावी. सोडत प्रक्रियेमध्ये सर्वसाधारण झालेल्या जागांपैकी कोणत्या जागा सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित होतील हे निश्चित करण्यात यावे.

४. सोडतीनंतर त्यानुसार महिलांकरिता सुधारीत आरक्षण अधिसूचित करण्यात यावे व त्यास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

५. सार्वत्रिक निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच सर्वसाधारण पदांकरिता सुरु असलेल्या कार्यक्रमानुसार मतदान दि.२१/१२/२०२१ रोजी होईल. मात्र मतमोजणी पुढे ढकलण्यात येत असून त्या निवडणुकांची मतमोजणी दि. १९/०१/२०२२ रोजी होईल.

६. मतमोजणी पुढे ढकललेल्या ठिकाणी मतपेटया सुरक्षित ठिकाणी, योग्य त्या पोलीस बंदोबस्तात ठेवण्यासाठी योग्य ती सर्व कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावयाची आहे.

७. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे अनारक्षित करण्यात आलेल्या जागा या सर्वसाधारण / सर्वसाधारण महिलाकरीता अधिसुचित करुन भरण्याचा आणि <u>**एकत्रित निकाल**</u> जाहीर करण्याचा सुधारीत कार्यक्रम या पत्रासोबतच्या परिशिष्ट-१ नुसार आयोग जाहीर करीत आहे.

८. सदरील कार्यक्रमास योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी.

९. सदर सुधारीत कार्यक्रमानुसार सद्या सुरू असलेल्या आचारसंहितेचा कालावधी हा मतमोजणीच्या सुधारीत दिनांकापर्यंत लागू राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, मुंबई-१
४) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
५) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७) विभागीय आयुक्त, नागपूर
८) जिल्हा पोलिस अधिक्षक, भंडारा व गोंदिया
९) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई-४
१०) उपायुक्त, संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
११) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१२) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१३) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने



C:\Users\supriya.tendulkar\Desktop\cancellation of BCC post.docx

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-
रानिआ/जिपपंस/२०२१/प्र.क्र.०२/का.७,
दिनांक १७/१२/२०२१ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट-१

**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१५/१२/२०२१ च्या आदेशानुसार भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांमधील सार्वत्रिक निवडणुकीतील सर्वसाधारण महिला आरक्षणाची सोडत तसेच निवडणूक कार्यक्रम (एकत्रित मतमोजणीसह)**

| अ.क्र. | टप्पे | कार्यवाही कोणी करावी | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वसाधारण महिला प्रवर्गाच्या आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | २०/१२/२०२१ |
| २ | जिल्हा परिषद / पंचायत समितीमधील सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांच्या आरक्षणाची सोडत काढणे. | | |
| | अ) जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी | जिल्हाधिकारी | २३/१२/२०२१ |
| | ब) पंचायत समिती निर्वाचक गणासाठी (जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी) | तहसिलदार | |
| ३ | जिल्हाधिकारी यांनी निवडणूक विभाग/निर्वाचक गणातील आरक्षणाची सुधारीत अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | २४/१२/२०२१ |

| क्र. | निवडणूक कार्यक्रमाचा तपशिल | कार्यक्रमांचा दिनांक |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या तारखांची सूचना व निवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिध्द करण्याची तारीख | बुधवार, २९ डिसेंबर,२०२१ |
| २ | संकेतस्थळावर भरण्यात आलेले नामनिर्देशनपत्र निर्वाचन अधिकाऱ्यांनी स्विकारण्याचा कालावधी | बुधवार, २९ डिसेंबर,२०२१<br>(सकाळी ११ ते दु.३ पर्यंत)<br>ते<br>सोमवार, ०३ जानेवारी,२०२२<br>(सकाळी ११ ते दु.३ पर्यंत)<br>(रविवार दि.०२/०१/२०२२ रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.) |
| ३ | नामनिर्देशनपत्राची छाननी व त्यावर निर्णय देणे | मंगळवार,०४ जानेवारी,२०२२<br>(सकाळी ११ वाजल्यापासून) |
| ४ | वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार, ०४ जानेवारी, २०२२<br>( छाननीनंतर लगेचच ) |
| ५ | नामनिर्देशनपत्राचा स्विकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबतचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुध्द जिल्हा न्यायाधिशांकडे अपिल करण्याची शेवटची तारीख | शुक्रवार, ०७ जानेवारी,२०२२ |

| | | |
|---|---|---|
| ६ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिलावर सुनावणी व निकाल देण्याची संभाव्य शेवटची तारीख | सोमवार, १० जानेवारी,२०२२ |
| ७ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिल निकालात काढल्यावर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | सोमवार, १० जानेवारी,२०२२ |
| ८ | उमेदवारी मागे घेणे<br>(अ) जेथे अपील नाही तेथे | सोमवार, १० जानेवारी,२०२२<br>(सकाळी ११ ते दु.३. पर्यंत) |
| | (ब) जेथे अपील आहे तेथे | बुधवार, १२ जानेवारी,२०२२<br>(सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |
| ९ | निवडणूका लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप-<br>(अ जेथे अपील नाही तेथे | सोमवार, १० जानेवारी,२०२२<br>( दुपारी ३.३० नंतर) |
| | (ब) जेथे अपिल आहे तेथे | बुधवार, १२ जानेवारी,२०२२<br>( दुपारी ३.३० नंतर) |
| १० | मतदानाची तारीख | मंगळवार, १८ जानेवारी,२०२२<br>(सकाळी ७.३० ते ५.३० पर्यंत) |
| ११ | मतमोजणी तारीख<br>(दि.२१/१२/२०२१ रोजी मतदान झालेल्या जागांसह सर्व जागांची) | बुधवार, १९ जानेवारी,२०२२<br>(सकाळी १०.०० पासून) |
| १२ | निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे | सोमवार, २४ जानेवारी,२०२२ पर्यंत |

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र